# मराठी अर्थशास्त्र परिषद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ॲक्ट - १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट -१९५०
अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र. एफ-४६१५ मुंबई





# ४५ वा वार्षिक अहवाल

## सन २०२२-२०२३



# ४५ वे वार्षिक अधिवेशन

दि. ५,६ व ७ नोव्हेंबर २०२२

आयोजक

जालना एज्युकेशन सोसायटीचे,
आर.जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व
आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना.

# कार्यकारी मंडळ - २०२२ -२३



प्रा.डॉ. दिलीप अर्जुने
अध्यक्ष



डॉ. अविनाश निकम
कार्याध्यक्ष



डॉ. मारोती तेगमपुरे
कार्यवाह - खजिनदार



डॉ. राहुल म्होपरे
संपादक - अर्थसंवाद



डॉ. जितेंद्र तलवारे
सदस्य



डॉ. राजाराम पाटील
सदस्य



डॉ. दयालू राठोड
सदस्य



डॉ. सुरेश ढाके
सदस्य



डॉ. मनिषकुमार कायरकर
सदस्य



प्राचार्य डॉ. संजय धनवटे
सदस्य



डॉ. विजय भोपाळे
सदस्य



डॉ. सुरेश घुमटकर
सदस्य



डॉ. जयवंत इंगळे
सदस्य



डॉ. बाळासाहेब पाटील
सदस्य



डॉ. सुभाष सावंत
सदस्य



प्राचार्य डॉ. जनार्धन काकडे
स्विकृत सदस्य



डॉ. अनिलकुमार वावरे
स्विकृत सदस्य



डॉ. विशाल पावसे
स्थानिक - कार्यवाह



डॉ. अजय दरेकर
विश्वस्त



डॉ. विकास सुकाळे
विश्वस्त



डॉ. विठ्ठल घिनमीने
विश्वस्त

## मनोगत

मराठी अर्थशास्त्र परिषदेचा कार्यवाह-खजिनदार म्हणून आपल्यासमोर वार्षिक अहवाल ठेवताना आनंद होत आहे. सोलापूर येथे संपन्न झालेल्या परिषदेच्या ४३ व्या वार्षिक अधिवेशनात परिषदेचा कार्यवाह-खजिनदार म्हणून काम करण्यासाठी आपण सर्वांनी माझी अविरोध निवड केलात याबद्दल मी आपल्या ऋणातच राहणे पसंत करेन. आपली निवड कितपत यशस्वी ठरली यासंदर्भात आपण आवश्य विचार करावा, असे नम्रपणे सुचवावे वाटते. आपला विश्वास माझ्यासाठी लाखमोलाचा आहे.

पंचेचाळीस वर्षापासून श्रेष्ठत्वाचा वारसा जपणाऱ्या आपल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेची स्थापना ९ जानेवारी १९७७ रोजी झालेली आहे. ४५ वर्षांची वाटचाल यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या या परिषदेला समृद्ध, वैचारिक आणि उज्ज्वल ऐतिहासिक परंपरा आहे. महाराष्ट्र राज्य हे ज्ञानसंपन्न, गुणसंपन्न आणि प्रतिभा संपन्न असे पुरोगामी राज्य असून सामाजिक परिवर्तनाचे बीज असणाऱ्या भक्कम अर्थशास्त्र अभ्यासकांची एक फळी निर्माण करण्याचे अमूल्य असे कार्य मराठी अर्थशास्त्र परिषदेने केले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य भारतभर असून गुजरात, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगढ़, कर्नाटक आणि गोवा या बरोबरच विदेशातही आपले आजीव सभासद आहेत. सर्वत्र शिस्तीची, आपल्या निष्ठेची, अभ्यासाची छाप निर्माण करणाऱ्या या संस्थेचा कार्यवाह-खजिनदार असल्याचा सार्थ अभिमान वाटतो. याबरोबरच ही संधी केवळ आपल्यामुळेच मला प्राप्त झाल्याची जाणीवही नक्कीच आहे. या दीर्घ काळात परिषदेला आदरणीय प्रा.रविंद्र सबनीस, प्रा.व्य.सु पाटणकर, डॉ.आ.गो पुजारी, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्रा.चारूदत्त गोखले, डॉ.अनिल सूर्यवंशी आणि डॉ. राजेंद्र भांडवलकर यांनी कार्यवाह-खजिनदार पदाची धुरा अत्यंत निष्ठापूर्वक शिस्तबद्ध पद्धतीने आणि आर्थिक नियोजनात जबाबदारीने वाहिली आहे. या सर्वांनी या पदाला एक उज्ज्वल परंपरा व आदर्श संकेत निर्माण करून दिले आहेत. या सर्वांच्या निस्वार्थ कार्याबद्दल मी नितांत आदरभाव प्रकट करतो. अशा या गौरवशाली मराठी अर्थशास्त्र परिषदेवा कार्यवाह - खजिनदार म्हणून ४६ वार्षिक अधिवेशनानिमित्त ४५ वा वार्षिक अहवाल आपणासमोर सादर करताना मनस्वी आनंद होत आहे. आपल्या तन-मन-धन रूपी सहकार्याने परिषदेची वाटचाल अधिक समृद्ध व्हावी अशी अपेक्षा आहे.

मागील ४६ व्या वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत परिषदेला नावलौकिक प्राप्त होऊन राष्ट्रीय पातळीवर लोकमान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न झाला आहे. सातत्याने विविध उपक्रम नियमित वार्षिक अधिवेशन आणि अनेक पुरस्कार व पारितोषिकांच्या माध्यमातून परिवारातील घटकाला प्रोत्साहित करणारी मराठी अर्थशास्त्र परिषद ही एकमेवाद्वितीय ठरते. परिषदेच्या एकूणच जडणघडणीमध्ये परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.नी. वि.सोवनी याबरोबरच डॉ.वि.म.दांडेकर, डॉ.श्री.आ.देशपांडे, डॉ.वि.वि.बोरकर, प्राचार्य या.शि.महाजन, डॉ.आनंद नाडकर्णी, डॉ.स.ह.देशपांडे, डॉ.वि.बा.घुगे, डॉ.ह.कृ.परांजपे, डॉ.रविंद्र सबनीस, डॉ.गो.सी.कल्याणकर, डॉ.नलिनी पंडित, डॉ.रविंद्र दोशी, डॉ.श्रीनिवास खांदेवाले, डॉ.ज.फा.पाटील, डॉ.शशिकांत गंधे, डॉ.व्य.सु.पाटणकर, डॉ.के.जी.पठाण, प्रा.शि.ना.माने, डॉ.भ.ग.बापट, डॉ.दि.व्य.जहागिरदार, डॉ. र.पु.कुरुलकर, डॉ.सु.दा.तुपे, डॉ.भालचंद्र मुणगेकर, डॉ.अ.रा.पडोशी, डॉ.संतोष दास्ताने, डॉ. सूर्यकांत जगदाळे, डॉ. मधुकर शिंदे,डॉ.सर्जेराव ठोंबरे,प्रा.दिलीप कदम, डॉ.पी.बी.कुलकर्णी, डॉ.व्ही.बी.भिसे, डॉ.विनायक देशपांडे, डॉ.सौ.मुक्ता जहागिरदार, डॉ. आ. गो. पुजारी, डॉ. कैलास पाटील, प्राचार्य डॉ.जगन्नाथ पाटील, डॉ.श्रीराम जोशी,डॉ. सुहास आव्हाड, डॉ. शिवाजी भोसले, डॉ. रामचंद्र रसाळ, प्रा. चारूदत गोखले, डॉ.रामदास माहोरे, प्राचार्य डॉ.अनिल सूर्यवंशी, प्रा.डॉ. आर.बी. भांडवलकर आणि प्रा.डॉ. दिलीप अर्जुने यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. त्यामुळे त्यांचा नामोल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे. याबरोबरच माजी व सद्याचे कार्याध्यक्ष माजी कार्यवाह-खजिनदार, अर्थसंवादचे सर्व माजी व सध्याचे संपादक, माजी व सद्याचे विश्वस्त यांचेही योगदान उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सर्व माजी व सद्या कार्यरत सदस्यांचेही योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण अशा स्वरूपाचे राहिलेले आहे. आपल्या या परिवारातील सर्व सन्माननीय सदस्यांचे फार मोठे योगदान परिषदेला प्राप्त झाले आहे.

परिषदेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान कार्यकारी मंडळाचे अनेक पदाधिकारी राज्यातील विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर आपल्या कामाची स्वतंत्र छाप पाडीत आहेत. ही बाब सर्वांसाठी नक्कीच अभिमानाची आहे. यामध्ये परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. डॉ. आए.बी. भांडवलकर (माजी अध्यक्ष) अध्यक्ष- अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. डॉ. विकास सुकाळे. (विश्वस्त) अधिष्ठाता. मानव्यविद्या शाखा, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ. जितेंद्र तलवारे (कार्यकारिणी सदस्य) अध्यक्ष - अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, डॉ. जयवंत इंगळे (कार्यकारिणी सदस्य) अध्यक्ष- अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. बाळासाहेब पाटील (कार्यकारिणी सदस्य) अध्यक्ष- अर्थशाल अभ्यास मंडळ अभिमत विद्यापीठ, पनवेल, डॉ. जनार्धन काकडे, (स्विकृत कार्यकारिणी सदस्य), अध्यक्ष - अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. डॉ.

अनिलकुमार वावरे (स्विकृत कार्यकारिणी सदस्य) अध्यक्ष- अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, कर्मवीर भाऊराव पाटील रयत विद्यापीठ, सातारा. यांचा नामोल्लेख करता येईल.

मी आपल्या सर्वांचे सुरुवातीलाच आभार व्यक्त करतो. आपले स्वागत करतो आणि २०२२-२३ या वर्षाचा ४५ वा वार्षिक अहवाल आपल्या समोर ठेवतो. कृपया आपण यास मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

मराठी अर्थशास्त्र परिषदेची एकूण आजीव सभासदांची संख्या १९६५ पर्यंत पोहचली आहे. आपणास अभिमान वाटावा अशी ही प्रगती आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेची अर्थसंवाद ही त्रैमासिक संशोधन पत्रिका अखंडपणे आपणापर्यंत पोहचविण्याचा परिषद सातत्याने प्रयत्न करीत आहे. परिषदेचे संकेतस्थळ विकसित करण्यात आपणास यश आले असून यास ५ सप्टेंबर २०२३ रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहे. परिषदेचे कार्यालय परिषदेच्या स्वतःच्या वास्तूत सुरु व्हावे, ही आपण सर्व आजीव सभासदांची अनेक वर्षापासूनची इच्छा होती. आपल्या सर्वांच्या सकारात्मक प्रयत्नामुळे हा प्रश्न आपणास निकाली काढण्यात यश आले असून छत्रपती संभाजीनगर येथे परिषदेच्या स्वतःच्या वास्तूत आपले कार्यालय सुरु करता आले. याचा नक्कीच आनंद आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.नी. वि. सोवनी स्मृतीव्याख्यान अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आयोजीत केले जाते. ४५ व्या जालना येथील अधिवेशात बारावे पुष्प अर्थविषयक अभ्यासक प्रा. डॉ. अजित अभ्यंकर यांनी **'भारतातील बेरोजगारी निर्मुलन – निश्चित दिशा आणि उपाय'** या विषयावर गुंफले आहे. परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनापासून परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या योगदानाबाबत परिचय करून देणारे व्याख्यान दिले जाते. जालना येथे डॉ.स.ह. देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू, नियोजन आयोगाचे माजी सदस्य तथा माजी खासदार प्रा. डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी '**भारतातील वाढत्या आर्थिक विषमतेचे आव्हान, व्याप्ती, परिणाम आणि उपाय**' या विषयावर गुंफले. याच स्मृती व्याख्यानात देशाच्या मध्यवर्ती बँकेचे संचालक डॉ. आशुतोष रारावीकर यांनी 'शास्त्र अर्थपूर्ण जीवनाचे' या विषयावर व्याख्यान दिले.

जालना येथील अधिवेशनात तीन विषयावर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये **'आर्थिक सिद्धांत आणि प्रायोगिक पद्धती, पंधरावा वित्त आयोग : केंद्र राज्य वित्तीय संबधाची चिकित्सा',** आणि **'डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार'** हे चर्चासत्राचे विषय होते. ऐनवेळच्या चौथ्या चर्चासत्राचा विषय भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने भारताच्या आर्थिक विकासातील धोरणात्मक बदल (शेती,उद्योग व सेवा क्षेत्र ) यावर ठेवण्यात आला होता.

अधिवेशनाच्या काळात देण्यात येणारे विविध पुरस्कार व पारितोषिक यामध्ये प्रा. डॉ. अरुणा रारावीकर स्मृती (वृत्तपत्रातील लेखाला) आर्थिक लेख प्रथम पुरस्कार प्रा. संजय दादासाहेब ठिगळे यांच्या **चौकटीबाहेरच्या निर्णयाची गरज** तर द्वितीय पुरस्कार प्रा.कमलाकर हणवंते यांच्या **आर्थिक साक्षरता- एक दृष्टीक्षेप** या लेखाला देण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक प्रा.डॉ. सुभाष रा. गुर्जर यांच्या **'बँकिंग – संकल्पना आणि कार्यप्रणाली'** या पुस्तकास देण्यात आले. श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक डॉ. वर्षा गंगणे यांच्या **कोरोना : परिणाम आणि आत्मनिर्भर भारत** या ग्रंथास देण्यात आले. डॉ. रविंद्र सबनीस स्मृती पारितोषिक डॉ. आशुतोष रारावीकर यांच्या Business modeling for Successful urban Co-oprerative Banking in india. या लेखास देण्यात आले. प्रा.मो.स. भावे पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल डॉ. राजकुमार वाईगडे यांच्या 'भारताच्या भाववाढ नियंत्रण धोरणातील नवीन बदल' (जुलै-सप्टेंबर २०२१, खंड ४५, अंक २, पृ.क्र.१०९) आणि डॉ. अनिलकुमार कृ. वावरे व डॉ. सविता अ. वावरे यांच्या 'आभासी चलन : एका नव्या चलन युगाची नांदी' (जाने.- मार्च, २०२२, खंड ४५, अंक ४, पृ.क्र. २६०) या लेखकांना विभागून देण्यात आला.

अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास परिषदेच्या वतीने विविध पारितोषिके दिली जातात. यामध्ये कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु.१०००/- व सन्मानपत्र) डॉ. सुभाष भोसले- नाशिक यांच्या 'पंधरावा वित्त आयोग' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले. प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाणारे पारितोषिक डॉ. विशाल बेलुरे यांच्या 'प्रायोगिक अर्थशास्त्र आणि खेळ सिद्धांत : काही साक्षीपुरावे' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (रु.२०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (विद्यार्थ्यांकरिता) राजेंद्र सरोदे यांच्या सामाजिक योजनामध्ये १५ व्या वित्त आयोगाची भूमिका' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आला. पद्मजा गंधे पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (महिलांकरिता) डॉ. वैशाली ल. देशमुख यांच्या शोधनिबंधास देण्यात आला.

दोन अधिवेशनाच्या दरम्यानच्या काळात अनेक उपक्रम राबविले जातात. श्री. शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय धुळे. अर्थशास्त्र विभाग आणि मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित धुळे व्याख्यानमाला दिनांक २३ सप्टेंबर

२०२२ शुक्रवार रोजी पार पडली. या व्याख्यानमालेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मनोहर पाटील यांनी भूषवले. प्रमुख वक्ते म्हणून मा. सी. ए. जी.बी मोदी हे उपस्थित होते. प्रमुख वक्त्यांनी सूक्ष्म व लघु उद्योगाच्या माध्यमातून उद्योजकतेची संधी, या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. मनोज गायकवाड प्रा. डॉ. मोहन पावरा प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रा. डॉ अविनाश निकम यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेविषयी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात धुळे शहर, नगाव, नरडाणा येथील अर्थशास्त्राचे प्राध्यापक बंधू भगिनी उपस्थित होते.

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ संचशित कै. बिंदूरामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नाशिक रोड तसेच मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. सुधा मोकाशी उपक्रमांतर्गत **महाराष्ट्रातील जलसंधारण व मत्स्यव्यवसाय** या विषयावर दिनांक २० मार्च २०२३ रोजी संपन्न झाले. मा. श्री संदीप वाटेगावकर, प्रादेशिक उपायुक्त, मत्स्य व्यवसाय नाशिक, यांनी 'मत्स्य व्यवसाय' या संदर्भातील अभ्यासपूर्ण मांडणी केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. समीर लिंबारे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम कार्यक्रमासाठी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. जीवन सोळुंके यांनी कार्य्क्रमाचे उत्तम आयोजन केले.

जालना येथे संपन्न झालेल्या ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ४६ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. दिलीप अर्जुने, जालना यांची बहुमताने निवड झाली. विश्वस्त प्राचार्य डॉ. रामकृष्ण टाले यांची मुदत दि. ३१ मार्च २०२३ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दि. ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२६ या तीन वर्षासाठी विश्वस्त म्हणून डॉ. विठ्ठल घिनमिने याची बहुमताने निवड करण्यात आली. दि. ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२६ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळावर डॉ. जयवंत शंकरराव इंगळे - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. बाळासाहेब साहेबराव पाटील- मुंबई विद्यापीठ, मुंबई, डॉ. सुभास संपतराव सावंत-सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांची अविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रा.डॉ. सुभास दगडे – सांगली, डॉ. अजय देरेकर – बारामती, आणि डॉ. शामराव कुलकर्णी – बदलापूर यांनी काम पाहिले.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्येष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन, पदाधिकारी आणि विश्वस्तांचा सल्ला, कार्यकारणी सदस्यांचे सहकार्य, जाहिरातदार व वर्गणीदार यांचे आर्थिक पाठबळ, वृत्तलेखक, सूत्रसंचालक व तज्ज्ञ परीक्षक यांची निरपेक्ष सेवा आणि समस्त आजीव सदस्यांचे सहकार्य यामुळे कोणतेही कार्य करण्याची ऊर्जा निर्माण होते. यामुळेच मला माझ्या क्षमतेनुसार काम करता आले. खऱ्या अर्थाने याप्रसंगी मी फार भावनिक झालो आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यालय परिषदेच्या मालकीच्या वास्तूत सुरु व्हावे ही भावना आपण सर्व आजीव सभासदांनी जपली आहे. याकाळात परिषदेचे कार्यालय छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) सुरु करून आपणास सामुहिकपणे हे स्वप्न पूर्ण करता आले. आपण सर्व यामुळेआनंदित आहोत ही बाब आपल्या सर्वांसाठी नक्कीच समाधानाची आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६ व्या वार्षिक अधिशेनाच्या आयोजनाबाबत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे वाघिरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री मा.ना. अजितदादा पवार, सचिव मा. श्री. संदीपजी कदम आणि संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित शेळके (स्थानिक कार्याध्यक्ष), डॉ. विशाल पावसे (स्थानिक कार्यवाह) व त्यांचे सहकारी शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे ऋण व्यक्त करतो. आपणा सर्वांना मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४६ व्या वार्षिक अधिवेशनाचे (दि २५,२६ व २७ नोव्हेबर,२०२३) आग्रहपूर्वक निमंत्रण..

**धन्यवाद!**

**आपला स्नेहांकित**
डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार,

## ४६ वी वार्षिक साधारण सभा

सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेवी ४६ वी वार्षिक साधारण सभा दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ शनिवार रोजी दुपारी १२:३० वाजता वाघिरे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे येथे पुढील कामकाजासाठी प्रा.डॉ.दिलीप अर्जुने, जालना यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. आपण या सभेस उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

**स्थळ** : अंबड

**दिनांक** :१४ ऑक्टोबर २०२३

**आपला स्नेहांकित**
डॉ.मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह खजिनदार

**१.** दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करणे.

**२.** सोमवार दिनांक ०७ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी १२.१५ वाजता जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेन्झजी विज्ञान महाविद्यालय, जालना येथे संपन्न झालेल्या ४५ व्या वार्षिक साधारण सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणे. (जोडपत्र क्र. ००) पृष्ठ क्र. ०६

**३.** कार्यवाह खजिनदारांनी सादर केलेला सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचा अहवाल स्वीकारणे (जोडपत्र ०१) पृष्ठ क्र. ७.

**४.** अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षांचा अहवाल स्वीकारणे. (जोडपत्र ०२) पृष्ठ क्र. ८.

**५.** परिषदेच्या सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या हिशेबास (ताळेबंद) मंजूरी देणे (जोडपत्र ०३) पृष्ठ क्र. ९ व १०.

**६.** परिषदेच्या व अर्थसंवादच्या सन २०२४-२५ या वर्षांच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे (जोडपत्र ०५अ/आ) पृष्ठ क्र १२ व १३.

**७.** परिषदेच्या सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

**८.** परिषदेच्या ४७ व्या वार्षिक अधिवेशनाचे स्थान व चर्चासत्राचे विषय निश्चित करणे.

**९.** कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे यांची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२४ ते दि. ३१ मार्च २०२७ या तीन वर्षासाठी कार्यवाह-खजिनदार यांची निवड करणे.

**१०.** विश्वस्त डॉ. अजय रामकिशन दरेकर यांची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२४ ते दि. ३१ मार्च २०२७ या तीन वर्षासाठी एका विश्वस्तांची निवड करणे.

**११.** परिषदेच्या दि. ०१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च, २०२५ या एका वर्षासाठी अध्यक्षांची निवड करणे.

**१२.** ०१ एप्रिल २०२४ ते दि. ३१ मार्च २०२७ या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर सदस्यांची निवड करणे. मुदत संपणाऱ्या सदस्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

**१.** डॉ. जितेंद्र दगडू तलवारे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव.

**२.** डॉ. राजाराम केरबा पाटील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर.

**३.** डॉ. दयालु किसन राठोड, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

**४.** डॉ. सुरेश भास्कर ढाके, एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई

**५.** डॉ. मनिष काशिनाथ कायरकर, (१ ते १० विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठ)

**१३.** मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

### महत्वाच्या सूचना

१. गणपूर्ती अभावी वार्षिक साधारण सभा १५ मिनिटे तहकूब करून पुन्हा त्याच ठिकाणी सुरू होईल,अशा वेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. कृपया सभेला येतांना वार्षिक अहवाल सोबत आणावा. (**अहवाल परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.** http://www.marathiarthshatraparishad.com)

३. परिषदेच्या विविध पदाच्या रिक्त जागांसाठी निवडणूकीचे अर्ज कार्यवाह - खजिनदार यांच्या अंबड जि.जालना येथील कार्यालयात मिळतील. प्रत्येक अर्जाची किंमत कार्यकारणी सदस्य पदासाठी रुपये एक हजार आणि अध्यक्ष, कार्यवाह-खजिनदार व विश्वस्त पदांसाठी रुपये दोन हजार फक्त आहे. इच्छुकांनी मागणी केल्यास संबंधितांना अर्ज पाठविण्यात येईल.

४. उमेदवारी अर्ज परिषदेचे कार्याध्यक्ष यांचेकडे दिनांक २६ नोव्हेंबर, २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत अधिवेशन स्थानी स्वीकारले जातील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५. दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ किंवा त्यापूर्वी ज्या व्यक्ती परिषदेच्या आजीव सभासद झाल्या असतील अशा सदस्यांनाच निवडणूक प्रक्रियेत भाग घेता येईल. आजीव सभासद क्र. **१८४४** पर्यंतचे सदस्यच फक्त निवडणूकीला उभे राहण्यास व मतदान करण्यास पात्र आहेत.

६. मतदान प्रक्रियेत सहभागी होताना आजीव सदस्यांजवळ स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. यामध्ये आधारकार्ड, मतदानकार्ड (शासनाचे), पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, महाविद्यालयाचे प्राचार्यांनी दिलेले छायाचित्र असणारे ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे.

७. वार्षिक वृत्तांत, ताळेबंद, आय-व्यय पत्र या संबंधीचे व साधारण सभेत विचारावयाचे प्रश्न सदस्यांना परिषदेच्या कार्यालयाकडे (कार्यवाह-खजिनदार यांचे कडे) किमान ०५ दिवस अगोदर लेखी स्वरुपात पाठवावे लागतील.

**डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे**
कार्यवाह - खजिनदार

**प्रा. डॉ. दिलीप अर्जुने**
अध्यक्ष

## ४५ व्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त

(जोडपत्र क्र. 00)

मराठी अर्थशास्त्र परिषदेवी ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी दुपारी १२.१५ वाजता जालना एज्युकेशन सोसायटीचे, आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेन्झजी विज्ञान महाविद्यालय, जालना येथे प्रा. डॉ.आर. बी. भांडवलकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीला दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा ठराव कार्यवाह-खजिनदार यांनी मांडल्यानंतर सभागृहाने उभे राहून व मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर सभेच्या रीतसर कामकाजास सुरुवात झाली. सभेत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**१.** रविवार दिनांक १३ मार्च २०२२ रोजी सकाळी १०.४५ वाजता गो.सी.टोम्पे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार जि. अमरावती येथे संपन्न झालेल्या ४४ व्या वार्षिक साधारण सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देण्यात आली.

**२.** कार्यवाह-खजिनदारांनी सादर केलेला सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा अहवाल डॉ. संतोष दास्ताने यांनी कार्यकारी मंडळाच्या सभेत सुचविलेल्या दुरुस्त्यासह साधारण सभेने एकमताने स्वीकारला व मान्यता देण्यात आली.

**३.** अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचा अहवाल डॉ. संतोष दास्ताने यांनी कार्यकारी मंडळाच्या सभेत सुचविलेल्या दुरुस्त्यासह साधारण सभेने एकमताने स्वीकारला व मान्यता देण्यात आली.

**४.** परिषदेची सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या हिशोबास (ताळेबंद) डॉ. संतोष दास्ताने यांनी कार्यकारी मंडळाच्या सभेत सुचविलेल्या दुरुस्त्यासह साधारण सभेने एकमताने स्वीकारला व मान्यता देण्यात आली.

**५.** परिषदेच्या व अर्थसंवादच्या सन २०२३-२४ वर्षाच्या अंदाजपत्रकास एकमताने मंजूरी देण्यात आली.

**६.** परिषदेच्या सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षक (सीए) यांच्या नियुक्तीचा व मेहनताना ठरविण्याचा अधिकार कार्यवाह-खजिनदार यांना देण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

**७.** परिषदेच्या ४६ व्या अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे यांचे एकमेव निमंत्रण आले असल्यामुळे कार्यकारी मंडळाने त्याची शिफारस साधारण सभेस केली. त्यास एकमताने मान्यता देण्यात आली. यावेळी ४६ व्या अधिवेशनात चर्चा सत्रासाठी तीन विषय कार्यकारी मंडळाने शिफारस केली. त्यावर चर्चा करून पुढील तीन विषय साधारण सभेने निश्चित केले. (१) मानवी भांडवलाचे सैद्धांतिक विश्लेषण (२) केंद्र पुरुस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती. (३) महाराष्ट्रातील वहातुक व्यवस्थेचे अर्थशास्त्र.

**८.** विश्वस्त प्राचार्य डॉ.रामकृष्ण टाले, यांची मुदत दिनांक ३१ मार्च,२०२३ रोजी पूर्ण होत आहे. १ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च, २०२६ या तीन वर्षासाठी विश्वस्त म्हणून डॉ. विठ्ठल मा. घिनमीने, हिंगणघाट यांची बहुमताने निवड करण्यात आली.

**९.** दिनांक ०१ एप्रिल, २०२३ ते ३१ मार्च २०२४ या एका वर्षासाठी परिषदेचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. दिलीप अर्जुने, जालना यांची बहुमताने निवड करण्यात आली.

**१०.** दिनांक ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्ग २०२६ या तीन वर्षासाठी पुढील कार्यकारी मंडळ सदस्यांची अविरोध निनिवड करण्यात आली. (१) डॉ. जयवंत इंगळे - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. (२) डॉ. सुभाष सावंत - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. (३) डॉ. बाळासाहेब पाटील - मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**११.** अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी पुढील विषयावर चर्चा झाली.

११.१.परिषदेची वेबसाईट सुरु करून शिक्षक दिनी वेबसाईटचे लोकार्पण केल्याबद्दल कार्यकारी मंडळाच्या अभिनंदनाचा ठराव डॉ. सुरेश घुमटकर यांनी मांडला साधारण सभेने ठराव एकमताने मंजूर केला.

११.२. साधारण सभा अधिवेशन काळात पूर्वीप्रमाणे दुसऱ्यादिवशी घेण्यात यावी असा ठराव डॉ. जीवन सोळुंके यांनी मांडला. यावर चर्चा झाली पण निर्णय होऊ शकला नाही. चर्चेत डॉ. जे. एस. पाटील आणि डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी सहभाग घेतला.

११.३ अधिवेशन काळात चर्चासत्रातील विविध विषयावरील चर्चा प्रस्ताव रूपाने शासनाकडे योग्य पद्धतीने कळवाव्यात अशी सूचना डॉ. विनोद गावंडे यांनी केली.

१४.४ ज्या आजीव सभासदांनी दोन अधिवेशनाच्या कालावधीत ग्रंथ लेखन केले आहे. अशा आजीव सभासदांचा सत्कार करण्यात यावा अशी सूचना डॉ विशाल बेलुरे यांनी केली.

११.५ परिषदेची स्वतःची वास्तू खरेदीचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याची माहिती अध्यक्ष डॉ. आर.बी. भांडवलकर यांनी साधारण सभेला दिली. यावेळी एकमताने या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. यावेळी अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला.

सभेच्या शेवटी कार्यवाह-खजिनदार, डॉ. मारोती तेगमपुरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

**प्रा. डॉ. आर. बी. भांडवलकर**
अध्यक्ष

### अ) **मराठी अर्थशास्त्र परिषद लेखापरीक्षण अहवाल** (जोडपत्र क्र ०१)

| **खर्च** | **३१ मार्च २०२२ रक्कम** | **३१ मार्च २०२३ रक्कम** | **उत्पन्न** | **३१ मार्च २०२२ रक्कम** | **३१ मार्च २०२३ रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| अहवाल छपाई | **२९,८००.००** | **३०,२००.००** | बचत खात्यावरील व्याज | **२,६९३.००** | **५,४५९.००** |
| टपाल खर्च | ११,७८०.०० | **९,७५०.००** | गुंतवणूकीवरील व्याज | २,०३,०५८.८३ | **२,७७,५३९.५२** |
| स्टेशनरी व छपाई २०१९-२० | ३,०१५.०० | **-** | निवडणूक अर्ज विक्री | **७,५००.००** | **१०,३००.००** |
| बँक कमिशन | १२९.०० | **८,९७.००** | मतदार यादी विक्री | **४००.००** | - |
| झेरॉक्स | १,३५०.०० | **१,९२०.००** | इमारत निधी | **३०,०००.००** | **८१,०००.००** |
| प्रवास खर्च | ११,९८०.०० | **१३,३५०.००** | अधिवेशन प्रतिनिधी शुल्क | **११,०५०.००** | **१४,२५०.००** |
| मानधन मदतनीस = ४,८०० लेखणीस =३,८०० | ४,८००.०० | **३,८००.००** | आजीव सभासद वर्गणी | **१,११,६००.००** | **९३०००.००** |
| प्रिंटींग व इतर टायपिंग | ७,५००.०० | **८,७००.००** | सभासद सूची | **-** | **२,९००.००** |
| किरकोळ खर्च | २,२१०.०० | **२६,७०५.००** | इतर जमा | **२.००** | **७,५१.००** |
| व्याख्यानमाला व पारितोषिके | ३३,५००.०० | **५१,५००.००** | मुदत ठेव मोड | **-** | **१५,४६,२७०.००** |
| ऑडीट फी | १०,०००.०० | **१०,०००.००** | | | |
| अधिवेशन आणि इतर खर्च | - | **१२,५०५.००** | | | |
| कार्यालय खरेदीखत शुल्क | - | **१३,४३६.००** | | | |
| कार्यालय उद्घाटन | | **२८,१४०.००** | | | |
| कार्यालय रंग रंगोटी | | **१५,४१७.००** | | | |
| कार्यालय खरेदी | | **१७,२५,०००.००** | | | |
| आयकर | | **५,६२५.००** | | | |
| | १,१६,०६४.०० | | | | |
| ज्यादा उत्पन्न | २,५०,२३९.८३ | **१,०१,१७६.५२** | | | |
| **एकूण रुपये =** | **३,६६,३०३.८३** | **२०,३१,४६९.५२** | एकूण रुपये = | **३,६६,३०३.८३** | **२०,३१,४६९.५२** |

**स्थळ : ** अंबड

**दिनांक :** १४/१०/२०२३

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

**ब) अर्थसंवाद लेखापरीक्षण अहवाल** (जोडपत्र क्र.०२)

| **खर्च** | **३१ मार्च २०२२ रक्कम** | **३१ मार्च २०२३ रक्कम** | **उत्पन्न** | **३१ मार्च २०२२ रक्कम** | **३१ मार्च २०२३ रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| अर्थसंवाद छपाई व कागद | ३,५०,७१५.०० | २,३२,२५६.०० | अर्थसंवाद वर्गणी व जाहिरात | ४,५१,४५५.०० | २,१५,०००.०० |
| बँक कमिशन | ७१९.८४ | ३२४.५२ | म.रा.सा.सं.मं. मुंबई | २७,६७७.०० | ३४,१६८.०० |
| मानधन | २५००.०० | २५००.०० | इतर जमा | १.०० | - |
| पोस्टेज | ३७,४५५.०० | १३,९९५.०० | अर्थसंवाद तुट | - | १०,११७.५२ |
| प्रिंटींग व टायपिंग | ३,६८०.०० | ३,४००.०० | | | |
| झेरॉक्स | १८९०.०० | १,८६०.०० | | | |
| प्रवास खर्च | ४८५०.०० | ४,९५०.०० | | | |
| ज्यादा उत्पन्न | ७७,३२३.१६ | | | | |
| एकूण रुपये = | ४,७९,१३३.०० | २,५९,२८५.५२ | एकूण रुपये = | ४,७९,१३३.०० | २,५९,२८५.५२ |

**स्थळ :** अंबड
**दिनांक :** १४/१०/२०२३

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४६ वे वार्षिक अधिवेशन

## दि.२५,२६ व २७ नोव्हेंबर २०२३.

**वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे**

## मराठी अर्थशास्त्र परिषद - ताळेबंद (जोडपत्र क्र.०३)

| वर्ष | | रक्कम | | रक्कम | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च २०२२ | | दि.३१ मार्च २०२३ | |
| स्थायी निधी | | | **७८,५१७.०६** | | **७८,५१७.०६** |
| आजीव सदस्य | मागील | २२,४६,६७९.०० | | | |
| | जमा | १,११,६००.०० | | | |
| | | | **२३,५८,२७९.००** | | |
| प्रकाशन निधी | | | ७८,६०७.०७ | | ७८,६०७.०७ |
| अर्थसंवाद स्थायी निधी | | | **३,३४,३५३.०७** | | **३,३४,३५३.००** |
| इमारत निधी | मागील | १०,५५,०६९.०० | | | |
| | जमा | ३०,०००.०० | | | |
| | | | **१०,८५,०६९.००** | | |
| **पारितोषिके व पुरस्कार उपक्रम** | | | | | |
| धुळे व्याख्यानमाला निधी | | ७,५००.०० | | ७,५००.०० | |
| स्व. जमनालाल बजाज उपक्रम निधी | | ७५,०००.०० | | ७५,०००.०० | |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा वि. ग्रंथ पारितोषिक निधी | | १०,०००.०० | | १०,०००.०० | |
| मो.स.भावे पारितोषिक निधी | | ५,०००.०० | | ५,०००.०० | |
| कै.ग.प्र.पिंपरकर पारितोषिक निधी | | १३,५००.०० | | १३,५००.०० | |
| डॉ. रविंद्र सबनीस निधी | | ५०,०००.०० | | ५०,०००.०० | |
| डॉ.के.एच.ठक्कर पारितोषिक निधी | | ६,०००.०० | | ६,०००.०० | |
| श्रीमती पद्मजा गधे पारितोषिक निधी | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक निधी | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| मातोश्री बयाबाई श्री.कदम पारितोषिक निधी | | २,००,०००.०० | | २,००,०००.०० | |
| सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार | | २५,०००.०० | | २५,०००.०० | |
| प्रा. नि.वी.सोवनी स्मृती व्याख्यान निधी | | १,६४,५५०.०० | | १,६४,५५०.०० | |
| डॉ.सुधा मोकाशी पारितोषिक निधी | | १,००,०००.०० | | १,००,०००.०० | |
| स्व.प्रा.भास्कर ढाले पुरस्कार निधी | | ३०,०००.०० | | ३०,०००.०० | |
| डॉ. शंकर मोडक पुरस्कार निधी | | १,००,०००.०० | | १,००,०००.०० | |
| | | | **८,३६,५५०.००** | | **८,३६,५५०.००** |
| अग्रिम सुचीकरीता | मागील | | | १२,६००.०० (११,७००.००+९००.००) | |
| | जमा | | | २,९००.०० | |
| | | | १२,६००.०० | | **१५,५००.००** |
| अर्थसंवाद तुट निधी | | | १,५००.०० | | १,५००.०० |
| इतर देणे | मागील | ११,१५१.०० | | ८४,३५१.०० | |
| | जमा | ७८,३८०.०० | | ५२,९७१.०० | |
| | | ८९,५३१.०० | | १,३७,३२२.०० | |
| | अधिक चालू | -५,१८०.०० | **८४,३५१.००** | ७८,३८०.०० | |
| उत्पन्न खर्च हिशोब मागील ताळेबंदाप्रमाणे | | १८,२०,०९२.२७ | | २१,१७,१४५.०० | |
| अधिक चालू वर्षाची वाढ | | ३,२७,५६२.९९ | | १,०१,१७६.५२ | |
| | | २१,४६,७५५.२६ | | २२,१८,३२१.५२ | |
| वजा चालू वर्षाची तुट | | १,७१,१७८.०२ | २१,४६,७५५.२६ | - | २२,१८,३२१.५२ |
| | | | **७०,१६,५८१.००** | | **७२,२९,५२२.००** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १४/१०/२०२३

सही

**डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार

सही

**धनंजय मस्के &असोसीएटस**

सनदी लेखापाल

मराठी अर्थशास्त्र परिषद

ताळेबंद (जोडपत्र क्र. ०३)

| **जिंदगी** | | **रक्कम** | | **रक्कम** | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च २०२२ | | दि. ३१ मार्च २०२३ | |
| मुदतठेव व गुंतवणूक | | | **५८,२०,२५९.०** | | |
| **रोख बँकेतील शिल्लक** | | | | | ४३,८०,१८९.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया मुंबई | | ४५,३२४.८४ | | ४५,३२४.८४ | |
| बँक ऑफ इंडिया पुणे | | ४,९५,५०४.२४ | | ५,९७,५२६.२४ | |
| बँक ऑफ इंडिया कोहापूर | | ३,२४,०४९.०० | | १,७६,४७६.६८ | |
| कॅनरा बँक अंबड | | १,१७,२७७.०० | **९,८२,१५५.०८** | ७९,००५.२८ | **८,९८,३३२.२०** |
| व्याजावरील TDS | मागील | १,९०,५०४.०० | | १,८४,७४०.०० | |
| | चालू | २३,६६३.०० | | २५,७६१.०० | |
| | एकूण | | | २,१०,५०१.०० | |
| | परत | | २,१४,१६७.०० | - | |
| | | | | | **२,१०,५०१.००** |
| इमारत | | | | | **१७,२५,०००.००** |
| **एकूण रुपये** | | | **७०,१६,५८१.००** | | **७२,२९,५२२.००** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १४/१०/२०२३

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के & असोसीएटस**
सनदी लेखापाल

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**ई) ठेव गुंतवणूक पत्र (जोडपत्र क्र.०४)**

(ठेव गुंतवणूक ३१ मार्च अखेरची)

| अ.क्र. | बँकेचे नाव | प्रमाणपत्र क्रमांक | रक्कम | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | ३१ मार्च २०२२ | ३१ मार्च २०२३ |
| १. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ३६०३ | २,४८,३७०.०० | २,६०,५९२.०० |
| २. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ९४५२ | ७,२९,१८९.०० | ७,६२,३९७.०० |
| ३. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ५६२७ | १५,००,०००.०० | १५,००,०००.०० |
| ४. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ५०३५३७१००००१६१ | ३,४७,५१३.०० | ३,४७,५१३.०० |
| ५. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ५०३५३७१००००२९३ | ८०,०००.०० | ८०,०००.०० |
| ६. | बँक ऑफ इंडिया, पुणे | ५०३४५११००१३९८८ | ९९,६२९.०० | १,०४,४७१.०० |
| ७. | स्टेट बँक ऑफ, मुंबई | ३००५४८९५२५६ | ५५,०००.०० | ५५,०००.०० |
| ८. | टाटा इनकम फंड | T-१-००००२८५९३५३८ | २०,१२२.०० | २०,१२२.०० |
| ९. | युटीआय (सीआरटीएस) | १९९२१२१३/०३४४ | १,५०,७००.०० | १,५०,७००.०० |
| १०. | आय.डी.बी.आय. मुंबई | ७१०७००००३४८१२ | ५०,०००.०० | ५०,०००.०० |
| ११. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१६८ | ९,८०,२२८.०० | १०,०४,५५३.०० |
| १२. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१५० | ११,०४,८०३.०० | - |
| १३. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१५१ | १,१०,४८१.०० | - |
| १४. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१५२ | १,१०,४८१.०० | - |
| १५. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१५३ | १,१०,४८१.०० | - |
| १६. | कॅनरा बँक, अंबड | ४०१०००१५४ | १,१०,४८१.०० | - |
| | | | ५८,०७,४७८.०० | ४३,३५,३४८.०० |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १४/१०/२०२३

सही
**डॉ. मारोती तेगमपुरे**
कार्यवाह-खजिनदार

सही
**धनंजय मस्के &असोसीएटस**
सनदी लेखापाल

**मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध पारितोषिके**

**★डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु. १०००/-) ★ प्रा.मो.स.भावे पारितोषिक (अर्थसंवाद मधील उत्कृष्ट लेख) (रु. ५००/-) ★मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (रू.११०००/-) ★ प्रा. सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार (वृत्तपत्रातरील लेख प्रथम रू.१०००/- व द्वितीय पुरस्कार रु. ५००/-) ★ कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोधनिबंध) (रू.१०००/-) ★प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (स. ५००/-) ★ डॉ. शंकर मोडक पुरस्कार (रु.५०००/-) ★ डॉ. रविंद्र सबनीस पारितोषिक (रू.४०००/-) ★ डॉ.ज.फा. पाटील पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध विध्यार्थ्याकरीता ) (रू.२०००/-) ★ पद्मजा गंधे पारितोषिक ( अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध महिलांकरीता) (रू. १०००/-) ★स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास (रू. २०००/-)**

**मराठी अर्थशास्त्र परिषद अंदाजपत्रक**

**(जोडपत्र क्र.०५/ अ) २०२३-२४**

| **खर्च** | **रक्कम ३१ मार्च** | **उत्पन्न** | **रक्कम ३१ मार्च** |
|---|---|---|---|
| प्रवास खर्च | २२,०००.०० | साधारण शुल्क | १,२००.०० |
| हिशोब लिहिण्याचा मेहनताना | ५,०००.०० | बचत खात्यावरील व्याज | २६,०००.०० |
| लेखापरीक्षण शुल्क | १०,०००.०० | मुदत ठेवीवरील व्याज | २,७०,०००.०० |
| बँक कमिशन | १२००.०० | निवडणूक अर्ज विक्री | १५,०००.०० |
| टपाल खर्च | २०,०००.०० | पा.वा.गाडगीळ व्याख्यान | ५,०००.०० |
| अहवाल छपाई व कागद | ६,०००.०० | प्रतिनिधी शुल्क | १५,०००.०० |
| स्टेशनरी | ६,०००.०० | अर्थसंवाद वर्गणी व जाहिरात | १,२५,०००.०० |
| व्याख्यानमाला व पारितोषिक | ५०,०००.०० | | |
| टायपिंग व झेरॉक्स खर्च | ७,०००.०० | | |
| किरकोळ खर्च | ८,०००.०० | | |
| ज्यादा उत्पन्न | ३,२२,०००.०० | | |
| **एकूण रुपये** | **४,५७,२००.००** | **एकूण रुपये** | **४,५७,२००.००** |

| | | |
|---|---|---|
| **स्थळ :** अंबड | सही | सही |
| **दिनांक :** १४/१०/२०२३ | **डॉ. मारोती तेगमपुरे** | **धनंजय मस्के & असोसीएटस** |
| | कार्यवाह-खजिनदार | सनदी लेखापाल |

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# मराठी अर्थशास्त्र परिषद

**४६ वे वार्षिक अधिवेशन**

## दि.२५,२६ व २७ नोव्हेंबर २०२३.

**वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे**

**अर्थसंवाद अंदाजपत्रक**

**(जोडपत्र क्र.०५/ आ) २०२३-२४**

| खर्च | रक्कम ३१ मार्च | उत्पन्न | रक्कम ३१ मार्च |
|---|---|---|---|
| अर्थसंवाद छपाई | १,५०,०००.०० | अर्थसंवाद वर्गणी | ९०,०००.०० |
| स्टेशनरी | ३,५००.०० | जाहिरात | ५०,०००.०० |
| टपाल खर्च | ६,०००.०० | म.रा.सा.स.मंडळ,मुंबई | ४५,०००.०० |
| सहाय्यक मानधन | २५००.०० | अधिक्य | -१२,०००.०० |
| प्रवास खर्च | ५,०००.०० | | |
| बँक कमिशन | ५००.०० | | |
| झेरॉक्स | २,५००.०० | | |
| प्रिटींग व टायपिंग | ३,०००.०० | | |
| **एकूण रुपये** | **१,७३,०००.००** | **एकूण रुपये** | **१,७३,०००.००** |

**स्थळ :** अंबड

**दिनांक :** १४/१०/२०२३

सही

**डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार

सही

**धनंजय मस्के & असोसीएटस**

सनदी लेखापाल

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# मराठी अर्थशास्त्र परिषद

**४६ वे वार्षिक अधिवेशन**

## दि.२५,२६ व २७ नोव्हेंबर २०२३.

**वाघिरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सासवड ता. पुरंदर जि. पुणे**

**मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष**

| अधिवेशन | नांव | वर्ष | अधिवेशन | नांव | वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ ले | डॉ. नी.वि.सोवनी | १९७७-७८ | २४ वे | डॉ. भालचंद्र मुणगेकर | २०००-०१ |
| २ रे | डॉ. वि.म.दांडेकर | १९७८-७९ | २५ वे | डॉ. अ.रा. पडोशी | २००१-०२ |
| ३ रे | डॉ. श्री.आ.देशपांडे | १९७९-८० | २६ वे | डॉ. संतोष दास्ताने | २००२-०३ |
| ४ थे | डॉ.वि.वि.बोरकर | १९८०-८१ | २७ वे | डॉ. सूर्यकांत जगदाळे | २००३-०४ |
| ५ वे | प्राचार्य या.शि.महाजन | १९८१-८२ | २८ वे | डॉ. मधुकर शिंदे | २००४-०५ |
| ६ वे | डॉ.आनंद नाडकर्णी | १९८२-८३ | २९ वे | डॉ. सर्जेराव ठोंबरे | २००५-०६ |
| ७ वे | डॉ. स.ह.द देशपांडे | १९८३-८४ | ३० वे | प्रा. दिलीप कदम | २००६-०७ |
| ८ वे | डॉ. वि.बा.घुगे | १९८४-८५ | ३१ वे | डॉ. पी.बी. कुलकर्णी | २००७-०८ |
| ९ वे | डॉ. ह.कृ.परांजपे | १९८५-८६ | ३२ वे | डॉ. व्ही.बी. भिसे | २००८-०९ |
| १० वे | डॉ. रविंद्र सबनीस | १९८६-८७ | ३३ वे | डॉ. विनायक देशपांडे | २००९-१० |
| ११ वे | डॉ. गो.सी.कल्याणकर | १९८७-८८ | ३४ वे | डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार | २०१०-११ |
| १२ वे | डॉ. नलिनी पंडित | १९८८-८९ | ३५ वे | डॉ. आ.गो.पुजारी | २०११-१२ |
| १३ वे | डॉ. रविंद्र दोशी | १९८९-९० | ३६ वे | डॉ. कैलास पाटील | २०१२-१३ |
| १४ वे | डॉ.श्रीनिवास खांदेवाले | १९९०-९१ | ३७ वे | प्राचार्य डॉ.जगन्नाथ पाटील | २०१३-१४ |
| १५ वे | डॉ. ज.फा. पाटील | १९९१-९२ | ३८ वे | डॉ. श्रीराम जोशी | २०१४-१५ |
| १६ वे | डॉ. शशिकांत गंधे | १९९२-९३ | ३९ वे | डॉ. सुहास आव्हाड | २०१५-१६ |
| १७ वे | डॉ. व्य.सु.पाटणकर | १९९३-९४ | ४० वे | डॉ. शिवाजी भोसले | २०१६-१७ |
| १८ वे | डॉ. के.जि. पठाण | १९९४-९५ | ४१ वे | डॉ. रामचंद्र रसाळ | २०१७-१८ |
| १९ वे | प्रा. शि.ना. माने | १९९५-९६ | ४२ वे | प्रा. चारुदत्त गोखले | २०१८-१९ |
| २० वे | डॉ. भ.ग. बापट | १९९६-९७ | ४३ वे | डॉ. रामदास माहोरे | २०१९-२० |
| २१ वे | डॉ. दि.व्य. जहागिरदार | १९९७-९८ | ४४ वे | प्राचार्य डॉ. अनिल सुर्यवंशी | २०२०-२२ |
| २२ वे | डॉ. र.पु. कुरुलकर | १९९८-९९ | ४५ वे | डॉ. आर.बी. भांडवलकर | २०२२-२३ |
| २३ वे | डॉ. सु.दा.तुपे | १९९९-०० | ४६ वे | डॉ. दिलीप अर्जुने | २०२३-२४ |

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध उपक्रम

*** स्व. जमनालाल बजाज उपक्रम**

*** पत्रपंडित पा.वा.गाडगीळ व्याख्यान**

*** डॉ. सुधा मोकाशी पुरुस्कृत (व्याख्यान) चर्चा सत्र**

*** माजी अध्यक्षांचे योगदानाबाबत व्याख्यान**

*** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व्याख्यानमाला**

*** भार्तीयार्जीत नोबेल पुरस्कार स्मृती परिसंवाद**

*** डॉ. नी.वि.सोवनी व्याख्यान (अधिवेशन काळात)**

*** धुळे व्याख्यानमाला (अधिवेशन काळात)**




मराठी अर्थशास्त्र परिषद






समारोप समारंभ


दिनांक ७ नोव्हेंबर २०२२, सोमवार


मराठी अर्थशास्त्र परिषद
४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
२०२२-२३
J. E. S. COLL


दिनांक ७ नोव्हेंबर २०२२, सोमवार









बुक-पोस्ट

प्रति,

* प्रेषक *

**डॉ. मारोती तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
संगाई घर नं. २२, शहीद भगतसिंगनगर,
भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड.
जि. जालना -४३१२०४, भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७